International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शेतीविषयक दृष्टीकोन

**मिलिंद बाबूराव थोरात**

*हिंदी सहाय्यक प्राध्यापक भोगावती महाविद्यालय,कुरुकली ता. करवीर जि.कोल्हापूर*

*Corresponding Author – मिलिंद बाबूराव थोरात*

DOI - 10.5281/zenodo.18709635

**प्रस्तावना:**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते होत. विसाव्या शतकातील महानायक. हजारो वर्षांपासून दलित, उपेक्षित, वंचित व परिघाबाहेर असणाऱ्या समाजाची ठसठसती वेदना मांडणारा, बहिष्कृत भारताचा मूकनायक. जाती आणि वर्णव्यवस्थेने गुलाम बनविलेल्या माणसांचा पहिला बोलका स्वर. शतकानुशतके अज्ञान, दारिद्र्य, गुलामी आणि शोषणाच्या चक्रव्यूहात पुरते अडकलेल्या माणसांचा मुक्तिदाता. ज्ञानच माणसाला मुक्त करू शकते आणि सर्व अविद्येचे तेच मुख्य कारण आहे, ही त्यांची समाजशास्त्रीय मीमांसा. कष्ट करणारा पंडित, विचार आणि विवेकाचा मिलाफ असलेले व्यक्तिमत्व. उपेक्षित, वंचित आणि महिलांनाही सामाजिक समतेचे समान हक्क आणि अधिकार मिळायलाच हवेत, यासाठी आपले जीवन समर्पित करणा-या सामाजिक समतेच्या चळवळीचे उद्गाते, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह परिषदेतील जाहीरनामा शोषितांच्या मुक्तीचा आणि सामाजिक समतेच्या कृतिशील विचारांचा मंत्रजागर करणारे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर. सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, मानवतावादी नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे आणि सर्व समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य म्हणजे भारताच्या इतिहासातील गौरवशाली पर्व आहे.भारतीय अस्मितेचे हे प्रतीक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणून सर्वपरिचित आहेत. तथापि, ग्रामीण भागाचे हितरक्षक आणि शेतक-यांच्या परिवर्तनासाठी त्यांनी मांडलेले विचार फारसे समोर आले नाहीत. त्यामुळे शेतीची हानी झाली.

शेतीवर जगणारा देश म्हणजे भारत अशी आपली वास्तव स्थिती आहे. शेती असणारे शेतकरी, शेती नसणारे कारागीर, शेती नसणारे शेतमजूर, सारे भारतीय जनसमूह शेतीवरच जगतात. छोटी मोठी शहरे जो व्यवहार करतात, तोही शेतीमालाच्या व्यवहारावरच करतात. असे असले तरी शेती आणि शेतकरी शतकानुशतकांपासून विवंचनेत जीवन जगत आला आहे. इतिहास त्या सा-याचा साक्षीदार आहे. त्याच्या सहनक्षमतेचा अंत झाल्याने तो आत्महत्या करतो आहे. हे त्याचे वर्तमान आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा भरघोस वाटा राहिलेला आहे. जो शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, तोच आम्हास वस्त्रही देतो. मग तो भुकेला, कंगाल, दरिद्री आणि वस्त्रहीन का आहे? अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांचा मागोवा घेणे अधिक प्रासंगिक ठरते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची प्रचंड जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंध करायचा, तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. आपल्या देशातील शेतकरी आणि राज्यकर्ते यांच्या उदरनिर्वाहाचे

साधन म्हणजे शेती अशी मानसिकता आहे. बाबासाहेबांचा या मानसिकतेलाच आक्षेप होता. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, राष्ट्रीय उत्पन्नाचा स्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतक-यांसह अनेक शेतमजुरांना रोजगार देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा दृष्टिकोन असला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. शेती विकसित होऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनला, तर ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडेल. राष्ट्राची अर्थव्यवस्थाही मजबूत होईल.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगद्विख्यात अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी शेतीच्या प्रश्नाविषयी मुलभूत अभ्यास केलेला होता. शेतीचा नेमका प्रश्न काय आणि त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजेत, याविषयी त्यांनी केलेली मांडणी आजही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आहे. शेतीच्या आणि शेतक-यांच्या प्रश्नांचा आयुष्यभर विचार केला. त्यासाठी त्यांनी भूमिका घेतल्या, चळवळी केल्या. त्यांच्या चळवळीचे, भूमिकांचे आणि विचार-तत्वज्ञानाचे केंद्र छोटे शेतकरी राहिले आहेत.

**संशोधन लेखाची उद्दीष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधन लेखाची उद्देश पुढीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय शेतीविषयक दृष्टीकोन समजून घेणे
2. जमिनीच्या मालकी हक्कांबाबतच्या प्रथा, परंपरा समजून घेणे.
3. शेतीतून होणाऱ्या सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक शोषणाचा शोध घेणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आधुनिक शेतीतील त्यांच्या विचारांची प्रासंगिकता तपासणे.

**संशोधन लेखाची गृहितकृत्ये :**

प्रस्तुत संशोधन लेखाची गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडले आहेत

1. शेतजमिनीच्या मालकी हक्काबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेली भूमिका तपासणे.
2. अल्पक्षेत्र भूधारकांच्या सर्वांगीण विकासासाठी विकसित होत गेलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची उपयुक्तता पाहणे.
3. आर्थिक व सामाजिक समतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विकसित होत जाणाऱ्या शेतीविषयक धोरणांचा आढावा घेणे.
4. भारतीय शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता पाहणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर करण्यात आला असून यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे.

**प्राथमिक साधने:-**भारतातील शेती व खोती पद्धती याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः व्यक्त केलेले, मांडलेल्या दृष्टिकोनांचा परामर्श प्राथमिक साधनांच्या आधारे घेतला आहे.

**दुय्यम साधने:-** यामध्ये शेतीच्या संदर्भातील इतर लेखकांनी लिहिलेले लेख, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे व इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेतीव्यवस्था, तिच्या समस्या आणि तिची अवस्था यासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडल्याचे दिसून येते. '१९१८ मध्ये 'The Journal of Indian Economic society' च्या अंकात Small

Holdings in India and their Remedies हा लेख प्रसिद्ध झाला. डॉ. आंबेडकरांनी या लेखात शेती हा भारताच्या दृष्टीने एक महान राष्ट्रीय उद्योग असून सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व सर्वाधिक असल्याचे विशद केले. डॉ. आंबेडकरांनी गेल्या ९०-९५ वर्षापुर्वी शेतीविषयक उपस्थित केलेले प्रश्न जेवढे मार्गदर्शक होते तितकेच किंबहूना त्याहीपेक्षा अधिक आज मार्गदर्शक आहेत असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. त्यांच्या मते, विभाजन अपखंडन व अल्पधारण क्षेत्र ही भारतीय शेतीची अत्यंत गंभीर व भेडसावणारी समस्या असून या संदर्भात **डॉ. आंबेडकरांनी तीन प्रश्न उपस्थित केले.**

1. 'जमिनीच्या विभाजन व अपखंडनामुळे साधन संपत्तीचा कार्यक्षम पद्धतीने वापर होत नाही तरीही जमिनीचे विभाजन व अपखंडन का घडून येते?
2. मोठे धारणक्षेत्र कार्यक्षम आणि लहान धारणक्षेत्र अकार्यक्षम असते का?
3. विभाजन व अपखंडनामुळे निर्माण झालेल्या समस्येवर कोणते उपाय आहेत?

**सहकारी शेतीचा दृष्टीकोन:**

भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरांनी सहकारी शेतीचा पुरस्कार केला. श्री. एफ.जी.एच. अॅन्डरसन यांनी मुंबई कायदेमंडळात अल्पभूधारक मदत विधेयक (Small Holders Relief Bill) ऑक्टो. १९२७ मध्ये मांडले. 'विखुरलेली धारणक्षेत्र' व अशा धारणक्षेत्रांचे लहान आकारमान या मुंबई राज्यातील शेतीव्यवसायाला भेडसावणाऱ्या दोन समस्यांवर उपाययोजना सूचविणे हा प्रस्तुत विधेयकाचा उद्देश होता. श्री. अॅन्डरसन यांच्या विधेयकात दोन तरतूदी होत्या.

**1)** स्थावर (प्रामुख्याने जमीन) मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण यामुळे वारसा हक्कानुसार एका ठराविक आकारापलीकडे जमिनीचे तुकडे पडणार नाहीत.

**2)** एकसंघ धारणक्षेत्राची विक्री.

परंतु डॉ. आंबेडकरांनी प्रस्तुत विधेयकावर घणाघाती हल्ला केला आहे. धारणक्षेत्राचे विभाजन थांबविण्यासाठी श्री अॅन्डरसन यांनी सूचविलेल्या उपायांचा जर स्वीकार केला तर शेतीवर अवलंबून असणारे असंख्य लोक भूमिहीन होऊन त्यांचे दारिद्रय वाढेल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. वडिलोपार्जित संपत्तीवाटपाच्या या न्याय व योग्य पद्धतीचा अभिनिषेध करणाऱ्या या विधेयकातील मुद्यांना ते स्पष्ट विरोध दर्शवितात.

विखुरलेली जमीन ही शेतीतील मोठी अडचण आहेच त्यासाठी या जमीनीचे एकत्रिकरण व्हायला हवे. परंतु शेतीचे आकारमान वाढले जाऊन मोठा समाजघटक भूमिविरहीत होणार असेल तर हा मार्ग धोक्याचा आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सहकारी शेती हा सर्वात्कृष्ट मार्ग ते सूचवितात. कारण या मार्गाने जमीनीचे एकत्रिकरणही होईल. जमीनीचे आकारमान वाढेल. जमीन मशागतीसाठी लागणारे किमान भांडवल, मनुष्यबळ व तंत्रज्ञानही एकमेकांच्या सहाय्याने उपलब्ध होऊ शकेल. त्यातूनही कुणाच्या जमिनीवरील मालकी हक्कावरही गदा येणार नाही. बाबासाहेबांनी सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'सहकारी शेती' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या सहकारी तत्त्वावर विकसित कराव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. पीक पद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार

नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार, शेतमालाला रास्त भाव मिळेल. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादनामुळे होणारे शेतमालाचे नुकसानही टळेल.

अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक यांचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. छोट्या क्षेत्रावर शेतीत आधुनिकीकरण करून उत्पादन वाढविणे शक्य होणार नाही, यावर बाबासाहेबांचे ठाम मत होते. जमिनीच्या विखंडनाची मुख्य कारणे म्हणजे वारसा हक्क आणि हस्तांतर हे आहेत. दारिद्र्य, दुष्काळ, व्यसनाधीनता, अज्ञान, कलह ही जमिनीच्या विखंडनाची महत्त्वाची कारणे आहेत, असे बाबासाहेबांचे मत होते.

**खोती पद्धती:**

'कोकण प्रांत शेतकरी संघाचे मार्गदर्शक नेते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वाची भूमिका घेतली. कोकणातील खोतांनी शेती कसणाऱ्या कुळांना जेरीस आणले होते. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात आदिलशहाने ताब्यात घेतलेल्या रत्नागिरी भागात खोतांची नेमणूक केली. डोंगराळ भागात लोकवस्ती वाढविणे,अधिकाधिक जमीन वहितीखाली आणणे, शेतसारा वसुली करणे ही कामे खोत करीत असत. डोंगराळ भागात शेतसारा वसुली अडचणीची असल्याने 'खोती' पद्धती अस्तित्वात आली. वजनदार 'असामी' पाहून ही नेमणूक होत असे. खोती पद्धतीत सर्व जमीन खोतांच्या ताब्यात असे. पेशवाईमध्ये खोतांना जमिनीच्या मालकीच्या रीतसर सनदा देण्यात आल्या. ब्रिटीशांनी 'खोती वतन' अधिनियमाने खोती पद्धतीला मान्यता दिली. खोत जमिनीचे हक्कदार आणि कुळाकडून जमीन कसून घेणे अशी पद्धती मान्य झाली. खोत हे जमीनदार आणि वतनदार असायचे. शेतकऱ्यांकडून शेतसारा जमा करून तो सरकार दरबारी जमा करण्याचे काम खोत करायचे. मात्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा, अशिक्षितपणाचा फायदा घेऊन ते शेतकऱ्यांची लूट करायचे. खोताच्या घरी काम असेल तेव्हा कुळाने विनामोबदला काम करायचे. खोताच्या घरी पाणी भरणे, दिवाळीच्या सणाला घर साफ करणे, सारवून देणे, लाकडे फोडणे, घरातील लोकांची सेवा आणि पाहुणे आल्यास बडदास्त आदी अनेक कामे करावी लागत. टाळाटाळ केली किंवा नकार दिला तर कुळांवर जूलूम केले जात.जमिनीचा अकरा महिने भाडेपट्टा लिहून घ्यायचा, एका एकरमागे खंडीभर भात मक्ता म्हणून घ्यायचा, तो जर नाही दिला तर पुढच्या वर्षी दीडपट सारा वसूल करायचा, एखाद्या कुळातील वसुली न झाल्यास त्या कुळाच्या शेतात असणाऱ्या आंबा, फणस, नारळाच्या झाडांवर खोताचा हक्क असायचा, हे सर्व प्रकार कोकण भागात मोठ्या प्रमाणात सुरू होते.

त्याविरुद्ध १९०५ पासून शेतकरी संघटित झाले. हे संघटन वाढत गेले. त्यातूनच ‘कोकण प्रांत शेतकरी संघाची’ स्थापना झाली. महात्मा जोतीराव फुले, महर्षि वि.रा.शिंदे यांच्या चळवळींचा आणि कोकणातील महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळींचा परिणाम झालेला होताच. कोकणातील शेतकऱ्यांच्या या चळवळीचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नारायण नागू (ना.ना.) पाटील, भाई अनंतराव चित्रे, सुरबा नाना टिपणीस, शामराव परूळेकर अशा मान्यवरांनी केले. अन्यायकारक खोती पद्धती विरुद्ध रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लढा दिला. वढाव ता. पेण, वाशी ता. पेण, पोलादपूर, चिपळूण, माणगाव, महाड, खेड, तळा, रोहा येथे शेतकऱ्यांच्या सभा झाल्या. या सर्व सभा, परिषदा १९०५ ते १९३१ या कालावधीत डॉ. आंबेडकर, ना.ना. पाटील, भाई चित्रे, सी.के. बोले, टिपणीस, परूळेकर आदींच्या नेतृत्वाखाली पार पाडल्या. या आंदोलनाला बाबासाहेबांचा भक्कम पाठिंबा तसेच सहभाग होता. चरी येथे या प्रदीर्घ

ऐतिहासिक संपाला २७ ऑक्टोबर १९३३ रोजी प्रारंभ झाला. या प्रदीर्घ संपाचे नेतृत्व नारायण नागू पाटील यांनी केले. खोती विरुद्धच्या या संग्रामात चरी (ता. अलीबाग), कोपरपाडा, रायंदे, कोलटेंभी, कोपर या गावासह १४ गावांचे लोक सहभागी झाले. १९३३ ते १९३९ अशी सात वर्षे हा संप चालला. शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील हे पहिले आंदोलन होते. संपाच्या आणि मोर्चाच्या परिणामाने शासनाने तात्कालीन महसुलमंत्री मोरारजी देसाई समिती नेमली. या समितीचा अहवाल कुळाने शेती वहिवाटी करणाऱ्या शेतकऱ्यांनी आनंदाने आणि खोतांनी नाईलाजाने स्वीकारला. त्यामुळे १९३३ साली सुरू झालेली चरीचा प्रदीर्घ संप १९३९ साली मिटला. या प्रदीर्घ संपामुळे १९४८ साठी जमीन महसूल संहिता बदलली.खोती निर्मूलन अधिनियम १५ मे १९५० पासून लागू करण्यात आले. त्यानुसार खोती पद्धत नष्ट झाली. अन्यायकारक खोती पद्धतीचा अंत झाल्याने एक लाख बावीस हजार आठशे साठ (१,२२,८६०) एकर जमीन मुक्त झाली. पुढे कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ नुसार 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व लागू करण्यात आले.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळात मांडलेल्या खोती निर्मुलन विधयेका बद्दल डॉ.नरेंद्र जाधव म्हणतात,"कुळ म्हणून जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून विधयेक मांडणारे आणि त्याचबरोबर सामाजिक चळवळ उभारून खोती पद्धतीवर दुहेरी हल्ला चढवणारे डॉ.आंबेडकर पहिलेच लोकप्रतिनिधी होते,हे लक्षात घेण्याजोगे आहे."

**शेतकरी मोर्चा:**

१० जानेवारी १९३८ रोजी मुंबई कौन्सीलच्या असेंब्लीवर भव्य मोर्चा काढण्यात आला. 'मोर्चा कमिटी' ने नियोजित केलेल्या या मोर्चात कोकण, सातारा, नाशिकसह अनेक जिल्ह्यातील शेतकरी सामील झाले होते. या मोर्चातील शेतक-यांनी खोती पद्धती नष्ट करा, सावकारशाहीला मूठमाती द्या, शेतक-यांचा विजय असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणा दिल्या. काळबादेवी, चौपाटी, ठाणे, कल्याण अशा विविध मागनि शेतकरी नियोजनबद्ध रीतीने, शिस्तीने आझाद मैदानावर जमा झाले. त्यावेळच्या काँग्रेस प्रांतिक सरकारचे, व्यापा-यांचे, धनिकांचे धाबे दणाणले. भाई चित्रे, याज्ञिक, परूळेकर, पोतनीस, प्रधान, मिरजकर, लालजी पेंडसे, राजाराम भोळे, डॉ. भोईर, सुरबा टिपणीस, मडके बुवा जाधव आदी मंडळी या मोर्चात सामील झालेली होती. २०-२५ हजार शेतक-यांचा हा मोर्चा गगनभेदी घोषणा देत मुंबईच्या कौन्सील हॉलला वळसा घालून पुन्हा आझाद मैदानावर सायंकाळी पाच वाजता आला. ना. खेर यांना शिष्टमंडळाने निवेदन दिले. मागण्यांसंबंधी चर्चा झाली. भाई चित्रे, कॉ. याज्ञिक, द. वि. प्रधान, कॉ. लालजी पेंडसे, मिरजकर, टिपणीस यांची सर्व शेतक-यांसमोर भाषणे झाली. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले.

**राज्य समाजवाद-सामुहिक शेती:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवाद आणि समाजवादाचा सखोल अभ्यास केला. भारतातील दलित, पीडित, शोषित आणि इतर आदिवासी समाजाची शोषणातून मुक्तता करण्याकरिता त्यांनी मध्यम मार्ग म्हणून राज्यसमाजवादाची संकल्पना मांडल्याचे दिसते. राज्य समाजवादाद्वारेच भारतातील दलित, शोषित लोकांची शोषणातून मुक्तता होऊन देशाचा विकास घडून येईल असे त्यांना वाटत होते. अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने डॉ. आंबेडकरांनी '१५ मार्च १९४७ रोजी घटना समितीला एक मेमोरेंडम सादर केले. हे मेमोरेंडम

'राज्य आणि अल्पसंख्यांक' या नावाने परिचित आहे. हे मेमोरेंडम अद्वितीय असून डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाची ती ब्ल्यू प्रिंट होय असे अर्थतज्ञांचे मत आहे. 'आर्थिक क्षेत्रातील संस्थाचा विचार मांडतांना साधन संपत्तीचा मालकी हक्क, त्याचे नियंत्रण आणि राष्ट्रीय न्याय वाटप यासाठी एका विशिष्ट आर्थिक चौकटीच्या प्रस्थापनेचा' डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता." राज्य समाजवाद ही संकल्पना '१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रचलित झाली. ही चळवळ संपुर्ण समाजवादाची नव्हती. कारण खाजगी मालमत्ता व अनर्जित वाढीव उत्पन्न यावर कोणत्याही स्वरूपाचे बंधन या कल्पनेच्या आधारे घालण्यात आले नव्हते. डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या **राज्य**

**समाजवादाची काही महत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:**

१. 'जे उद्योग प्रमुख आहेत किंवा जे उद्योग प्रमुख पायाभूत म्हणून जाहिर करण्यात आलेले आहेत असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावेत आणि ते राज्याद्वारे चालविले जावे.
२. जे उद्योग प्रमुख नाहीत, असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावे आणि राज्याद्वारे किंवा राज्यात स्थापन केलेल्या मंडळाद्वारे चालविण्यात यावे.
३. विमा हा राज्याचा एकाधिकार असावा.
४. शेती हा राज्याचा उद्योग असावा.

देशातील ८० टक्के जनता शेतीवर उदरनिर्वाह करत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा लक्षात घेऊन या क्षेत्राचे सहकारीकरण करावे आणि शेतकऱ्यांना भांडवल पुरवावे, अशी संकल्पना बाबासाहेबांनी मांडली होती. शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, कसदार बियाणे, उत्तम खते (Machinery, hard seeds, good fertilizers) देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे बाबासाहेबांनी ठासून सांगितले होते. शेतीसाठी लागणारी अवजारे आधुनिक पाहिजेत, पारंपरिक पद्धतीने केलेली शेती कधीच फायदेशीर ठरणार नाही, आधुनिकीकरणासाठी जमिनीचे छोटे-छोटे तुकडे नाही तर एकत्रिकरण होणे आवश्यक आहे. ही वरील त्रिसूत्री शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक असल्याचे बाबासाहेबांनी त्या वेळेस सांगितले होते.

**राष्ट्रीय सिंचन धोरण:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर १९४२ ते ४६ या कालावधीत श्रम, सिंचन, (Labor, irrigation,) विद्युतशक्ती समितीचे अध्यक्ष झाले होते. भारताचे पाटबंधारे व ऊर्जामंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. भारतात संयुक्त प्रकल्प, बहुउद्देशीय प्रकल्प या संकल्पना सर्वप्रथम बाबासाहेबांनीच मांडल्या. केंद्रीय कॅबिनेटमंत्री असताना चार वर्षांच्या काळात त्यांनी दामोदर नदी प्रकल्प, हीराकुंड प्रकल्प, सोनू नदी प्रकल्प व देशातील १५ मोठ्या धरणांची ब्लू प्रिंट तयार करून कामाला सुरुवात केली होती. या सर्व प्रकल्पांचा उद्देश पूर नियंत्रण, जलसिंचन, विद्युतनिर्मिती, (Flood control, irrigation, power generation,) पाणीपुरवठा हा होता. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि पाण्यामुळे देश जगतो हे बाबासाहेबांनी सांगितले होते .शेतीला पूरक तांत्रिक संस्थांची निर्मिती करणे काळाची गरज आहे हे बाबासाहेब जाणून होते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार दामोदर प्रकल्प, हिराकूड प्रकल्प इत्यादी प्रकल्प सरकारने हाती घेतले.

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी आर्थिक समृद्ध झाला तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकाला या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत.

पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे.शेती व शेतमजूर समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. ही योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खोऱ्यांची विभागणी केली. यावरून डॉ. बाबासाहेब यांच्या दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते.

**शेतसारा वसुली बाबत भूमिका:**

शेतसारा आकारणी ठरवून देण्यासाठी ब्रिटिश सरकारने 'लॅण्ड रेव्हेन्यू कमिटी' नेमली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या कमिटीची भेट घेतली आणि चर्चा केली. सदर कमिटीसमोर साक्ष देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. कमिटीने डॉ. आंबेडकरांची साक्ष कौशल्याने टाळली. या कमिटीच्या निमित्ताने 'केसरी' या दैनिकातून 'शेतसारा किती द्यावा' या शीर्षकाचा अग्रलेख दिनांक २८ जुलै १९२५ साली प्रसिद्ध झाला. या अग्रलेखातील मते वाचून डॉ. आंबेडकरांनी 'शेतक-यांचे प्रश्न' हा लेख लिहून केसरीकडे पाठविला आणि आपली या विषयावरील भूमिका मांडली. १८ ऑगस्ट १९२५ ला प्रसिद्ध झालेल्या या लेखात म्हटले आहे की, शेतीच्या निव्वळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरून सरसकट शेतसारा आकारणी गैर आणि अन्यायकारक आहे. या लेखात ते म्हणतात,'खर्च वजा जाता राहील ते उत्पन्न, असा ठोकताळा घेतला तरी खर्च आणि उत्पन्न ह्यांचे प्रमाण सर्व सारखेच सापडणार नाही. कधी कधी समान प्रमाणात उत्पन्न घेण्यास असमान प्रमाणात खर्च करावा लागतो. असा जेव्हा प्रसंग येईल, तेथे सर्वसाधारण एकच खर्चाचा आकडा धरून उत्पन्न आकारणे गैर होईल' सर्व शेतक-यांकडून शेतीच्या क्षेत्रफळानुसार अंदाजे उत्पन्न गृहीत धरून शेतसारा वसूल केला जातो. हेच अन्यायकारक आहे. उत्पन्नानुसार कर लावण्याची पद्धती आणि कायदा असताना सरकार शेतसारा आकारणी बेकायदेशीर करते, असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते. सरकार जमिनीवरील उत्पन्नावर कर बसविते की जमिनीवर? शेतक-यावरील कर की उत्पन्नावरील कर? म्हणून शेतसारा कसा वसूल केला जातो हे जरा न्यायाने, नीतीने ठरविले पाहिजे, ही त्यांची आग्रही भूमिका होती.कर लावण्यासाठी उत्पन्न कर (Income Tax) प्रणाली आणि कायदा आहे. त्यानुसार शेतसारा आकारावा. उत्पन्न कर लावताना कमी उत्पन्न असणा-या शेतक-यांना या करातून सूट मिळावी. त्यामुळे गरीब शेतक-यांची आपदा वाचेल. अधिक आर्थिक ऐपत असणा-यांना अधिक कर आणि कमी आर्थिक ऐपत असणा-यांना कर नाही, हाच नियम शेतक-यांना लागू करावा. त्यामुळे विवंचनेत असणा-या, दारिद्र्याने गांजलेल्या शेतक-यांना यातून सूट मिळेल. शेतसारा आकारणी पद्धतीत अशी तरतूद नाही. त्यामुळे 'आधीच दारिद्र्याने गांजलेले आहेत, त्यांच्यावर पुन्हा कराचे ओझे देऊन गांजणे, हे बुडत्याला लाथ मारून बुडवण्याइतके घातक आणि निष्ठुरपणाचे आहे. ही त्यांची भूमिका या लेखातून मांडली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यासंबंधीचा उपायही या लेखातून मांडला आहे.

**निष्कर्ष**

भारताच्या शेती समस्ये बाबतचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टिकोन सतत विकसित होत गेलेला दिसतो. सुरुवातीला ते शेती क्षेत्रावर असणारे अतिरिक्त मनुष्यबळ,भांडवल,यंत्रसामुग्रीचा तुटवडा याचा परिणाम म्हणून कमी उत्पादकता व त्यामुळे नफा तयार होण्याचा मंद वेग आहे, त्यामुळे आर्थिक प्रगती होण्यात अनेक अडचणी निर्माण होतात.

शेतीवरील अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रात सामावून घेण्याचा तोडगा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविला; पण औद्योगिकरणाची प्रक्रिया त्वरित घडून येणारी नसल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'सहकारी शेतीचा' मार्ग सुचविला. कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांचा सामाजिक,राजकीय व आर्थिक दृष्टिकोन व्यापक होता. प्रत्येक क्षेत्रातील शोषित घटकाला न्याय मिळवून देणे हे त्यांच्या विचाराचे अंतिम उद्दिष्ट होते. त्यामुळे शेतात घाम गाळणाऱ्या कुळांच्या शोषणावर आधारलेले खोती पद्धती नष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केले.

अंतिमतः भारताच्या सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेबाबतच्या भूमिकेतून आर्थिक समता प्रस्थापित झाली तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल. या दृष्टिकोनातून राज्य समाजवादाचा एक भाग म्हणून सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली. या दृष्टिकोनातून जमीनदार,कुळ, शेतमजूर हा भेद नष्ट होईल. तसेच औद्योगीकरण व सहकारी शेती याही पेक्षा 'सामुदायिक शेती' अंतिम न्यायाची ठरेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मत होते.

आजही शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे लागते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो. डॉ. बाबासाहेब यांचे शेतीबाबतचे विचारधन राज्यकर्ते नियोजनकार व शेती तज्ज्ञांनी अभ्यासले पाहिजेत.

**संदर्भ सूची:**


1. लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धाः दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., ५, पहिला मजला, नमः शिवाय अपार्टमेन्ट्स ५२५, नारायण पेठ, मोदी गणपतीजवळ, पुणे-४११०३०, प्रथमावृत्ती, २०११
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,खंड १८ भाग-३ पान-२७७.
3. थोरात सुखदेव, बाबासाहेब आंबेडकरः नियोजन, जल व विद्युत विकास- भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे-३०, द्वितीया मराठी आवृत्तीः १५ ऑगस्ट २०१०
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई विधिमंडळातील कार्य, संपादक प्रा. सुरेश शेवाळे अनुवादक बी.के. राऊत, प्रथमावृत्ती ६ डिसेंबर 2016 सारनाथ प्रकाशन बुक डेपो परभणी.
5. रायखेलकर ए.आर., दामजी बी.एन., आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स,औरंगपुरा,औरंगाबाद,दुसरी आवृत्ती:जून २०११.
6. डाहाट धनराज (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरः भाषणे आणि विचार, खंड-४, संकेत प्रकाशन, एन.आय. टी. संकुल क्र.६३, हिल रोड, गांधीनगर, नागपूर- ४४००१०, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट, २००८
7. धांडे भगवान., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन समाज, कौशल्य प्रकाशन, एन-११, सी. ३/२४/३, हडको, औरंगाबाद-४३१००३, प्रथमावृत्तीः ६ डिसेंबर २००५
8. सोमवंशी बी.सी.,अर्थशास्त्रज्ञ डॉ. बी.आर.आंबेडकर, आनंद प्रकाशन,जयसिंगपुरा,औरंगाबाद,आवृत्ती: १४एप्रिल २०१२.